**महाराष्ट्र विधानसभा**

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**----------------------------------------------**

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०२ जुलै, २०२५ / आषाढ ११, १९४७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) शालेय शिक्षण मंत्री**<br>**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**<br>**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री**<br>**(८) वस्त्रोद्योग मंत्री**<br>**(९) सहकार मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

**-----------------------------------**

**प्रश्नांची एकूण संख्या - ३२**

**-----------------------------------**

**राज्यात वीज कोसळण्याची संभाव्य पूर्वसूचना देणारी सयंत्रे बसविण्याबाबत**

**(१) * ७१९२ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी माहे एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत वीज कोसळून शेकडो शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०२३ च्या आकडेवारीनुसार एकूण २६९ शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज कोसळून शेतकऱ्यांचे होणारे मृत्यू रोखण्याकरिता परदेशात वापरण्यात येणाऱ्या अवघ्या रु.१० लाख इतक्या किंमतीच्या यंत्रामुळे सुमारे २५० किलोमीटर क्षेत्रफळात ४५ मिनिटे अगोदर वीज कोसळण्याची पूर्वसूचना देण्यात येत असल्याने ही यंत्रे राज्यात आवश्यक त्या ठिकाणी बसविल्यास वीज कोसळून नाहक होणारे मृत्यू टाळता येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर यंत्रणा कार्यान्वित करुन शेतकऱ्यांचे मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या सन २०२२ च्या प्रकाशित आकडेवारीनुसार २३६ मृत्यूची नोंद आहे. सन २०२३ ची अधिकृत आकडेवारी अद्याप उपलब्ध झालेली नाही. तथापि सन २०२३ मध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून उपलब्ध माहितीनुसार १८१ इतकी मनुष्यहानी झाल्याची नोंद आहे.
(३) व (४) वीज कोसळून होणारे मृत्यू टाळण्यासाठी आय.आय.टी.एम. पुणे या राष्ट्रीय शिखर संस्थेने या संदर्भात विकसित केलेले दामिनी ॲप्लिकेशन आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मार्फत सचेत प्रणाली यांचा वापर करुन ४० कि.मी.च्या परिघामध्ये कोसळणाऱ्या संभाव्य वीजेबाबतची पूर्वसूचना नागरिकांना एसएमएस (SMS) व नोटिफिकेशन माध्यमातून जवळपास अर्धा तास अगोदर दिली जाते. तसेच विभागाद्वारे नागरिकांनी वीज कोसळण्याच्या वेळी घ्यावयाची खबरदारी याविषयी विविध माध्यमांतून वेळोवेळी जनजागृती करण्यात आली आहे.

परदेशात वापरण्यात येणाऱ्या या संदर्भातील यंत्रणा देशात प्रचलित झाल्याचे निदर्शनास आल्याचे दिसून येत नाही. अशी यंत्रणा उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग करणेबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर शहरातील आकाशवाणी मार्गावरील संरक्षक भिंतीच्या बांधकामामध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(२) * ८४१२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील आकाशवाणी मार्गावरील नाल्यावर रू.९५ लक्ष इतका निधी खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या संरक्षक भिंतीचे काम निधीचा गैरवापर होत असल्यामुळे थांबवावे, यासंदर्भात लेखी तक्रार एका राजकीय पक्षाच्यावतीने दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील नाल्यामुळे दरवर्षी निर्माण होणारी पूर परिस्थिती लक्षात घेता त्यावर एकही संरक्षक भिंत अद्याप न बांधता केवळ निकटवर्तीयांसाठी ती संरक्षक भिंत बांधण्यात येत असून निधीचा गैरवापर होत असल्याची तक्रार सदर निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने सदर संरक्षक भिंतीचे बांधकाम थांबविण्याबाबत शासनाने कार्यवाही करुन सदर निधीचा गैरवापर करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी चौकशी केली असून चौकशी अहवालानुसार ज्या दिशेला पूर संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आले तिथे नाल्या लगत वस्ती आहे. शिवाय दरवेळी पावसाळयात नाला तुडुंब भरुन वाहत असल्याने लगत असलेल्या वस्तीला त्याचा फटका बसतो. दुसऱ्या बाजुला लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु तेथील वस्ती साधारण १०० ते २०० मीटर अंतरावर येते. त्यामुळे लगत असलेल्या वस्तीला जास्त प्रमाणात धोका आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत त्या बाजूच्या संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले आहे.

निधी उपलब्धतेनुसार दुसऱ्या बाजूला संरक्षक भिंतीचे काम करता येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उरळ (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे सोयाबीन खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(३) * १०६४४ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरळ (ता.बाळापूर, जि.अकोला) येथे सोयाबीन खरेदीत अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर शेतकरी उत्पादक कंपनीने शासनाच्या नावाखाली शेतकऱ्यांची रु.६३,४४,९२४/- इतक्या रक्कमेची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४-२०२५ च्या हंगामात सदर कंपनीने प्रत्यक्षात १९,७२३.९२ क्विंटल सोयाबीन खरेदी केले असून त्यापोटी वेअर हाऊसच्या १८,४२६.९२ क्विंटलच्या पावत्या पणन कार्यालयात जमा केल्याचे दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोयाबीन खरेदीनंतर ते विनाविलंब महाराष्ट्र राज्य साखर संघाच्या गोदामात जमा करणे, वेअर हाऊस पावत्या व इतर माहिती जिल्हा पणन कार्यालयात जमा करणे इत्यादी बाबींची उक्त कंपनीने पुर्तता न केल्याने नाफेडमार्फत शेतकऱ्यांना पैशांचा मोबदला मिळू शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट प्रकरण सादर करणाऱ्या कंपनीविरुध्द तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४)

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार नाफेडच्या वतीने अकोला जिल्हयात सोयाबीन खरेदीत अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी, अंदुरा यांनी खरेदी कालावधीत ऑनलाईन १९,७२३.९२ क्विंटल सोयाबीन खरेदी केले असून त्यापैकी १८,४४७.५५ क्विंटलच्या वखार पावत्या नाफेड कार्यालयास सादर केल्या. तथापि, सदर संस्थेने उर्वरित १२९७ क्विंटल खरेदीची नोंद पोर्टलवर घेऊन सोयाबीन वखार महामंडळाच्या गोदामात जमा केला नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना नाफेडकडून शेतकरी चुकारे अदा केले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी संस्थेचे संचालक व इतर ११ यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन उरळ ता.बाळापूर, जि.अकोला येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनीने हंगाम २०२४-२५ मध्ये सोयाबीन खरेदीत अनियमितता केल्याप्रकरणी संस्थेस काळ्या यादीत टाकून केंद्र व राज्यशासनाच्या कोणत्याही खरेदी प्रक्रियेत समाविष्ट करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची देयके अदा करण्यासंदर्भात संस्थेस देय असलेली सर्व रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे.

तसेच अंदुरा ॲग्रो प्रो.कं. या खरेदी केंद्राची अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. रोखून ठेवलेल्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम वसूली प्रकरणी मा. न्यायालयात वसूलीसाठी दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील कोकण आपत्ती व्यवस्थापन व सौम्यीकरण अंतर्गत करण्यात आलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामांबाबत**

**(४) * ७१९५ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाने निसर्ग व तौक्ते या भीषण वादळानंतर "कोकणात आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर संरक्षक भिंत, दरड प्रतिबंधात्मक कामे, बहुउद्देशीय निवारा केंद्र, खार बंधारे व भूमिगत विद्युत वाहिनी" आदि कामांकरीता सन २०२१ मध्ये मंजूर केलेल्या रु.४,७००.०० कोटी रकमेतून (ता.वसई,जि. पालघर) पाचुबंदर, रानगाव, भुईगाव व नवापूर येथे समुद्राच्या पाण्यापासून शेती संरक्षणासाठी रु.३०.०० कोटी एवढी रक्कम मंजूर करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २ ते ३ वर्षांपासून सातत्याने पाचुबंदर, रानगाव, भुईगाव व नवापूर येथे समुद्राच्या भरतीचे पाणी शेतात शिरण्याचे प्रमाण वाढल्यामुळे किनाऱ्यालगत भातशेती, भाजीपाला व फुलशेती व पर्यटनाकरीता निसर्गरम्य असणारे समुद्रकिनारे उध्वस्त होत चालले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा सर्व निधी सन २०२५-२०२६ पर्यंत खर्च होणे अपेक्षित असतानाही अद्याप धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामांची सुरूवात झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी धूप प्रतिबंधक कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), दि. २३.०१.२०२४ अन्वये कोकण आपत्ती सौम्यीकरणांतर्गत वसई तालुक्यातील नवापूर, भुईगांव, रानगांव,पाचुबंदर येथील ४ कामांना रु. २९,१३,८०,८१६/- इतक्या अंदाजित रक्कमेच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) सागरी पूरसंरक्षक बांधांचे संकल्पन हे केंद्र शासनाच्या केंद्रिय जल व विद्युत संशोधन संस्था, पुणे (CWPRS) यांच्याकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत दि. २५.१०.२०२३ रोजी सुरू करण्यात आली आहे. तसेच आवश्यक सर्वेक्षण करून सर्व माहिती CWPRS, पुणे कार्यालयास सादर करण्यात आली आहे. सदर संकल्पन व परवानगी प्राप्त करून घेणेसाठी MSRDC प्रयत्नशील असून तदनंतर CRZ परवानगी प्राप्त झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेकायदेशीररित्या राहात असलेल्या बांगलादेशी कामगारांवर कारवाई होणेबाबत

**(५) * ७८१७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील फळ, भाजीपाला बाजारात माथाडी कामागारांऐवजी मोठया प्रमाणात बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी कामगार काम करीत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माथाडी कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी पणन विभागास आणि स्थानिक पोलीस ठाण्यास अनेक वेळा लेखी तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीमधील बांगलादेशी कामगारांचा शोध घेऊन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, नवी मुंबई येथे पाच बाजार आवारे असून त्यापैकी फळ बाजार आवारात अनुज्ञप्ती धारक व्यापारी यांना कामगार उपलब्ध करून देण्याचे काम मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित नोंदणीकृत माथाडी कामगार मंडळ, मुंबई (माथाडी बोर्ड) करते. त्यानुसार माथाडी कामगारांचे कागदपत्रे व इतर चारित्र्य पडताळणी संबंधीत कामकाज माथाडी बोर्ड करते. माथाडी बोर्डाच्या नियंत्रणाखाली माथाडी कामगार बाजार आवारात व्यापा-यांकडे कामकाज करतात. एपीएमसी पोलिस स्टेशनचे कर्मचारी व बाजार समितीमधील सुरक्षा कर्मचारी यांचे मार्फत कोम्बींग ऑपरेशनची संयुक्त कारवाई वेळोवेळी करण्यात आलेली असून फळ व भाजीपाला बाजार आवारात एकही बांगलादेशी नागरिक, माथाडी कामगार अथवा इतर कामगार म्हणून कामकाज करतांना अद्यापपर्यंत आढळून आलेला नाही.

(२) मुंबई बाजार आवारात स्वतंत्र एपीएमसी पोलिस ठाण्याची स्थापना करण्यात आलेली आहे. बाजार समितीचे प्रशासन, सुरक्षा विभाग व स्थानिक एपीएमसी पोलिस ठाणे समन्वयाने जन जागृती मोहीम राबविण्यात आली आहे. बाजार आवारातील सुरक्षे संदर्भात पोलिस ठाण्याचे बिट मार्शल नियमितपणे गस्त घालत असून वेळोवेळी पोलीसांच्या समन्वयाने कोम्बींग ऑपरेशनची (मोहीम) कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच दि.०२.०५.२५ रोजी एपीएमसी पोलीस/क्राईम ब्रैंच व सुरक्षा विभाग यांचे संयुक्त विद्यमाने विशेष मोहिम राबवून २०० संशयित लोकांना पकडून त्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे तपासून त्यांची चौकशी करण्यात आली असून त्यामधील संशयित २५ ते ३० लोकांना पुढील अधिक तपासासाठी एपीएमसी पोलीस ठाण्याला नेण्यात येऊन पुढील कार्यवाही एपीएमसी पोलीस ठाणे मार्फत करण्यात येत आहे.

(३) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई, एपीएमसी पोलीस ठाण्याचे कर्मचारी व बाजार समितीमधील सुरक्षा कर्मचारी यांचे मार्फत कोम्बींग ऑपरेशनची संयुक्त कारवाई वेळोवेळी करण्यात आलेली असून फळ व भाजीपाला बाजार आवारात एकही बांगलादेशी नागरिक/कामगार कामकाज करतांना अद्यापपर्यंत आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(६) * ७२४५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी हजारो शिक्षकांचे प्रलंबित वेतन, वेतन निश्चितीकरण, ना- हरकत प्रमाणपत्र देणे, नियुक्तीस मान्यता या कामांमध्ये गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण संघटनेने दिनांक २ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) याप्रकरणी मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना यांनी दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या कार्यालयातील अनियमिततांच्या अनुषंगाने विविध तक्रारींबाबत निवेदन सादर करुन मा.मंत्री (शालेय शिक्षण) महोदयांकडे चौकशीची मागणी केली आहे. त्यानुषंगाने शासन पत्र दि.१३ जून, २०२५ च्या पत्रान्वये आयुक्त (शिक्षण), पुणे यांना याप्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असुन, अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याविरुद्धच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि.२५.०६.२०२५ च्या आदेशान्वये विभागीय अध्यक्ष, मुंबई विभागीय मंडळ यांची नियुक्ती केली आहे. तसेच, सदर प्रकरणाचा अहवाल त्वरित सादर करण्याबाबत चौकशी समितीस आदेशित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने जाहीर केलेल्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत

**(७) * ७९३९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० ची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभागामार्फत येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्याचे नियोजन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जून २०२५-२६ या वर्षापासून चार टप्प्यात विविध वर्गांना लागू करण्याचे तसेच पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयामुळे अनेक स्तरावरुन त्याचा विरोध होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहा वर्षे वयोगटाच्या बालकांचा विचार केल्यास एकाच वेळी मराठी व हिंदी अशा दोन भाषा शिकाव्या लागत असल्याने त्यांच्या मनात गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्यास होत असलेल्या विरोधाबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) सन २०२२ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० राज्य शासनामार्फत स्वीकारण्यात आलेले असून, सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांची अंमलबजावणी सुरु झाली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.

शासन निर्णय दि.३०/१२/१९९९, शासन निर्णय दि. ०४/०२/२००९, महाराष्ट्राच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम २०२०, शासन निर्णय दि.०१/०६/२०२० नुसार इतर आठ माध्यमाची मुले (कन्नड, सिंधी, गुजराती, बंगाली, उर्दू, तेलगु, हिंदी, तमिळ) इयत्ता १ ली पासून तीन भाषा - मातृभाषा, मराठी (अनिवार्य), इंग्रजी (अनिवार्य) शिकत आहेत.
राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, (४.१२) मध्ये बहुभाषिकतेबाबत तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) NCF-FS प्रकरण-३ मध्ये भाषा धोरणाबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.
(४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २९ जून, २०२५ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये, दि. १६ एप्रिल, २०२५ रोजीचा शासन निर्णय व दि. १७ जून, २०२५ रोजीचे शासन शुध्दिपत्रक रद्द करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. तसेच, राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सूत्राबाबतचे धोरण निश्चिती करण्याकरिता, शिक्षणतज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येणार असून, सदर समितीच्या अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शालार्थ प्रणालीतील अपात्र शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करणेसह त्यांना अदा केलेल्या वेतनाची रक्कम वसूल करणेबाबत

**(८) * ७११८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण),**

**श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर, भंडारा जिल्ह्यात शालार्थ प्रणालीमध्ये ५८० अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह मुख्याध्यापकांची नावे सामाविष्ट करुन अंदाजे १०० कोटी रुपयांच्या शासकीय निधीचा अपहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ पासून अपात्र कर्मचाऱ्यांना रू.४० ते ८० हजार इतके मासिक वेतन देण्यात आले असून नागपूर विभागातील नामांकित १२ शिक्षण संस्था, अधिक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक व (प्राथमिक) नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या संगनमताने सदर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण मंत्री यांनी चौकशी करण्याचे आदेश संबंधितांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर विभागातील घटनांप्रमाणेच राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही अशा प्रकारची अपात्र शिक्षक, शिक्षकेतर व कर्मचाऱ्यांची भरती होऊन त्यांना वेतन देण्यात आले असल्याचे तसेच याची व्याप्ती राज्यभर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अपात्र शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करून त्यांना देण्यात आलेल्या वेतनाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या शिक्षणसंस्था, संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह, चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती किंवा एसआयटी स्थापन करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) होय, अंशतः खरे आहे,

(३) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन आदेश दिनांक ०९.०४.२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार शिक्षण आयुक्तालयाच्या दिनांक १३.०४.२०२५ अन्वये नागपूर विभागातील बनावट शालार्थ आयडी प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरिता शिक्षण संचालक (योजना) योजना संचालनालय, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत

करण्यात आली आहे. सद्यस्थितीत चौकशी अधिकारी यांचेकडून या प्रकरणी चौकशी सुरु आहे. शालार्थ प्रणालीचा गैरवापर करुन शालार्थ आयडी जनरेट केल्यासंदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर यांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे दाखल अपराध क्र. २४/२०२५ व श्री. पराग नानाजी पुडके, मुख्याध्यापक यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्याध्यापक पदास शालार्थ आयडी प्रदान केल्यासंदर्भात सदर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे दाखल गुन्हयात नागपूर पोलीस विभागाकडून चौकशीची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरु आहे

उक्त नमूद दोन्ही गुन्ह्यांमध्ये शासन आदेश दिनांक २५.०४.२०२५ अन्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर, अधिक्षक (सा.रा.से.) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. नागपूर यांना निलंबित करण्यात आले आहे.

नागपूर शालार्थ आयडी गैरप्रकरणात निलंबनाची कारवाई करण्यात आलेले अधिक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक (प्राथमिक), नागपूर यांनी केलेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश आयुक्तालयाच्या पत्रान्वये विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना देण्यात आले आहेत.

(४) जळगांव जिल्हयातील ४९ शिक्षकांचे बनावट शालार्थ आयडी तयार केल्याप्रकरणी अनियमिततेस जबाबदार संबंधित अधिकारी यांचे विरुध्द दिनांक २९/०३/२०२५ रोजी नाशिक रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) नागपूर शालार्थ आयडी गैरप्रकरणाच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील नियमोचीत कारवाई करण्यात येईल तसेच माहे मार्च, २०२५ पासून नियमानुसार अधिकृत शालार्थ आयडीचे आदेश उपलब्ध असलेल्या पात्र शिक्षकांचेच वेतन अधीक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक (प्राथमिक) नागपूर यांचे स्तरावरुन करण्यात येत असून ज्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांचे अधिकृत शालार्थ आयडीचे आदेश उपलब्ध नाहीत अशा शिक्षकांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही.

(६) श्री. पराग नानाजी पुडके, मुख्याध्यापक यांना बोगस व बनावट कागदपत्रांच्या आधारे शालार्थ आयडी प्रदान केल्याच्या प्रकरणात सदर पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे दाखल गुन्हा क्र. २५४/२०२५ मध्ये शासन आदेश दिनांक २५.०४.२०२५ अन्वये निलंबनाची कारवाई करण्यात आलेले संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील नियम १९७९ मधील नियम ८ च १२ अन्वये संयुक्त विभागीय चौकशी सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात देखील विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना निर्देश देण्यात आले आहेत. सदर प्रकरणाची प्रशासकीय चौकशी करण्यासाठी शिक्षण संचालक (योजना) योजना संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरांतील शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविणेबाबत

**(९) *७६२७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरांतील अनेक शाळांमध्ये किमान पायाभूत सुविधा नसल्याचे तसेच सुमारे ३० टक्के शाळांची स्थिती विदारक असून, काही शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा शाळांमध्ये मैदानांची कमतरता असून स्वच्छतागृहे, प्रयोगशाळा व वाचनालयाचा अभाव,

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे अशा मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने संबंधित शाळांची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शाळांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) शासन व जिल्हा परिषदांकडून सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, वित्त आयोग, आमदार-खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान, शाळा दत्तक योजना या माध्यमांतून इमारतींचे बांधकाम, पायाभुत सुविधा व देखभाल दुरूस्ती केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अनेक बाजार समित्यांमध्ये सेस चोरीच्या माध्यमातून आर्थिक लूट होत असल्याबाबत

**(१०) * ८२२७ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक बाजार समित्यांमध्ये सेस चोरीच्या माध्यमातून कोटयवधी रुपयांची लूट होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे व मुंबई बाजार समित्यांमधील गैरव्यवहाराची चर्चा होत असतानाच आता मुंबई बाजार समितीमधील सेस चोरीप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने सेस चोरी होत असल्याचे आपल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेसची वसुली करणेसह यातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम-३१ नुसार बाजार समितीला फी आकारण्याबाबत तरतूद आहे. पुणे कृषि उत्पन्न बाजार समिती येथे शेतीमालाचे हिशोबपट्टीचे उलाढालीवर १ टक्के बाजार फी व ०.०५ पै. देखरेख खर्च आकारणी करुन आडते/व्यापारी दरमहिन्याचा सेस (बाजार फी) बाजार समितीकडे जमा करतेवेळी, हिशोबपट्टी व बिलपट्टीची एक प्रत बाजार समितीकडे जमा करतात. तसेच मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती येथे त्यांच्या उपविधी क्रमांक १६-क नुसार शेतमालाचे बिल, सेस पावती व प्रत्यक्षात वाहन जावक गेटवर आल्यानंतर, शेतमाल तपासणी कर्मचारी दैनंदिन बाजारभाव, सदरचे बिल, भरलेली सेस पावती व वाहनातील शेतमालाची शहानिशा करतात.

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती येथील फळ बाजारातील दि.०८.११.२०२३ रोजी दोन वाहनांनी कमी सेस भरणा केल्याची बाब आढळून आल्याने तेथील उपसचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८.१२.२०२३ रोजी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दि.२०.०३.२०२४ रोजी अहवाल सादर केला असून त्यामध्ये उपविधी

क्रमांक १६(१) नुसार प्रभावी अंमलबजावणी करणे व रोख विरहित व्यवहार करण्याकरिता संगणक प्रणालीच्या माध्यमातून देयके भरण्याकरिता क्यू-आर कोड प्रणाली अंमलात आणावी अशी शिफारस केली आहे.
(३) मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती येथील फळ बाजारातील थेट खरेदीदारांकडून बाजार फी, देखरेख फी, लेव्ही वसूल करण्यामागे दैनंदिन वसुली होत असल्यामुळे सेसच्या थकबाकीचे प्रमाण कमी आहे. तसेच वाहनांच्या तपासणीदरम्यान जास्त शेतमाल निदर्शनास आल्यास, तसेच प्रत्यक्ष बाजार भावापेक्षा कमीची बिले दिली असल्यास/ सेसची रक्कम कमी भरलेली आढळून आल्यास दंडात्मक वसुली करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोकनेते गोपीनाथ मुंडे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, केज, (जि.बीड) येथे झालेला गैरव्यवहार

**(११)** * **८२७४ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकनेते गोपीनाथ मुंडे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणी, केज (जि. बीड) चे अध्यक्ष व संचालक मंडळ यांनी समाज कल्याण प्रशासनास बनावट कागदपत्र, शपथपत्र, करारनामा व प्रमाणित यादी यासारखी अनेक बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक करून या आधी रू.१४ कोटी इतक्या रकमेची उचल केलेली असून आता रू.२२ कोटी ८६ लाख इतक्या रकमेची उचल मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केला असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहकारी सूत गिरणीचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांनी शासकीय निधीचा अपहार व गैरव्यवहार करुन बनावट प्रस्ताव व खोटी कागदपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी एकूण ०५ मुद्यांवर चौकशी करून वितरीत रक्कम वसूल करून सर्व संबंधितावर गुन्हे दाखल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्याचे वस्त्रोद्योग/सहकार मंत्री यांच्याकडे दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय सावकारे :** (१) होय, अशी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय, लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदनास अनुसरुन आयुक्तालयाचे स्तरावर प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेकरिता समिती नेमण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सोयाबीन पिकाला उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्याबाबत**

**(१२) * ८१७१ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जात असून अंदाजे पाच कोटी क्विंटल सोयाबीन उत्पादन होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाशिम जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य व नगदी पिक असल्याने मील क्वालिटी सोयाबीनचे दरही ४ हजार ३०० पेक्षा कमी असल्याने शेतकरी हताश होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक बाजारात सोयाबीन पेंडला अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना मागील दोन वर्षात प्रति क्विंटल रु.४०००/- पेक्षा कमी दराने विक्री करावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उत्पादन खर्चापेक्षा सोयाबीनला कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सोयाबीनला प्रति क्विंटल रु.७,०००/- इतका भाव देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय

(२) व (३) हे अंशत: खरे आहे

हंगाम २०२४-२५ मध्ये वाशिम जिल्हयात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फेब्रुवारी व मार्च २०२५ वगळता सोयाबीनचे बाजारभाव ४३०० पेक्षा कमी नाही.

तसेच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये हंगाम २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये सोयाबीन आवक विचारात घेता सरासरी दर ४०००/-प्रति क्विंटल पेक्षा खाली आलेले नाही.

(४) नाही

(५) केंद्र शासनाच्या धोरणानुसार किमान आधारभूत योजनेंतर्गत हंगाम २०२५ करिता सोयाबीन करीता रुपये ५३२८/-दर निश्चित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत**

**(१३) * ७४१८ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कौशल्य विकास विभागाकडून तरुणांना रोजगार आणि कौशल्यविषयक प्रशिक्षण देऊन रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी बेरोजगारांची नावनोंदणी करून घेतली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २९ लाख २९ हजार ६४१ बेरोजगार तरुणांनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान नोंदणी केली असल्याची आकडेवारी केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या नॅशनल करिअर सर्व्हिसच्या माध्यमातून निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांमध्ये उच्चशिक्षित, तंत्रज्ञान आदी विविध प्रकारच्या पदवी, पदविका आदींचे शिक्षण घेतलेल्या तरुणांचा समावेश आहे,
(४) तसेच नोकरीच्या शोधात असलेल्यांमध्ये सर्वाधिक तरुण हे ग्रामीण भागातील असून त्याखालोखाल शहरी भागातील आहेत, बेरोजगारीमुळे अनेक सुशिक्षीत तरुण नशेच्या आहारी जात असून, अनेकांचे संसार उद्‌ध्वस्त होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय करिअर सेवा (NCS) ही केंद्र शासनाची योजना असून तिचा उद्देश नोकरी शोधणाऱ्या आणि नियोक्त्यांना एकत्र आणणे आहे. NCS पोर्टलद्वारे नोकरी शोधणे, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण अशा रोजगार-संबंधित विविध सेवा पुरविण्यात येतात. नॅशनल करिअर सर्व्हिसच्या पोर्टलवरील माहे फेब्रुवारी, २०२५ अखेरच्या आकडेवारीनुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मिळूण एकुण २९ लाख २९ हजार ६४१ उमेदवारांनी नोंदणी केल्याचे दिसून येते. सदर उमेदवारांमध्ये शिकाऊ उमेदवारी योजनेतील उमेदवार, अर्धवेळ नोकरी करणारे उमेदवार, स्वयंरोजगार करणारे उमेदवार, नोकरी मागणारे उमेदवार इत्यादींचा समावेश आहे.
(४) व (५) राज्यातील युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी शासनाच्या विविध विभागांद्वारे योजना राबविण्यात येत आहेत. ग्राम विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नियोजन विभागाद्वारे रोजगार हमी योजना, उद्योग विभागाद्वारे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती, महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) व केंद्र शासनाची सुक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) इत्यादी योजना राबविण्यात येत असून त्याद्वारे राज्यातील युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

उद्योग विभागाद्वारे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत शबरी आदिवासी विकास महामंडळ, सामाजिक न्याय विभागांतर्गत महाज्योती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), अण्णाभाऊ साठे विकास मंडळ, नियोजन विभागांतर्गत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ अशी महामंडळे संबंधित लक्ष्यित गटासाठी कार्यान्वित करण्यात आली आहेत.

राज्यातील तरुण वयोगटातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. सदर सोसायटीमार्फत राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबद्ध प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदतीचे प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व उपजीविकेसाठी कौशल्य संपादन ज्ञान जागरुकता अभियान (SANKALP) ह्या केंद्र पुरस्कृत योजना आणि प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (प्रमोद महाजन- ग्रामीण

कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र) ह्या राज्य शासन पुरस्कृत योजना व किमान कौशल्य विकास केंद्र ही जिल्हा पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे.

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांना संयुक्त व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. त्याकरीता नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची तसेच नियोक्त्यांच्या नोंदणीसाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दि. २८.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना रु. १०.०० लक्ष पर्यंतची कामे विना निविदा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनांत ११ महिन्यांसाठी कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून त्यांना शैक्षणिक अर्हतेनुसार ₹ ६,०००/- ते ₹ १०,०००/- इतके विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दि म्युनिसिपल सहकारी बँक लि., वांद्रे,मुंबई या बँकेमार्फत बनावट दस्तऐवज तयार करुन कर्ज दिल्याबाबत

**(१४) * ७४५१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनातील कर्मचारी आणि अधिकारी यांना कर्ज देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या दि म्युनिसिपल बँकेच्या वांद्रे शाखेतील श्री.बिपिन चौहान या सावकाराने सीबीलची बनावट ना-हरकत प्रमाणपत्र सादर करून लाभार्थी तथा पालिका कामगार श्री.राजेश कांबळे यांना कर्ज मिळवून दिल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थी तथा पालिका कामगार श्री.राजेश कांबळे यांनी सावकाराविरोधात मुंबई पोलीस आयुक्त, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (डीडीआर-१), मुंबई शहर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

दि म्युनिसिपल बँकेच्या वांद्रे शाखेच्या लोन कमिटीने श्री. राजेश कांबळे यांना दि. ३०.०१.२०२५ रोजी रु. १५.५० लाख इतके कर्ज मंजूर केले आहे. सदर कर्ज प्रकरणाशी श्री. बिपीन चौहान यांचा कोणताही संबंध नसल्याचे बँकेने दि. १७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर कर्जासाठी श्री. कांबळे यांनी बनावट ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याचे बँकेच्या निर्दशनास आले आहे. त्याअनुषंगाने बँकेच्या वांद्रे शाखा व्यवस्थापिका यांनी वांद्रे पोलिस स्टेशन येथे दि. ०९.०४.२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) हे खरे नाही.

लाभार्थी तथा पालिका कामगार श्री. राजेश कांबळे यांनी मुक्त सावकाराविरुध्द जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुंबई शहर-१ यांचेकडे तक्रार दाखल केलेली नाही.

तथापि, श्री. रुपेश पुरळकर या पालिका कामगाराने श्री. बिपिन चौहान यांच्याविरोधात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर-१ यांच्याकडे दि. २१.०२.२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(३) श्री. पुरळकर यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपनिबंधक, सहकारी संस्था, अे विभाग, मुंबई यांच्याकडे कार्यवाही सुरू असून यासंबंधी दि. ०८.०५.२०२५ व दि. १७.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस दोन्ही पक्षकार उपस्थित राहिले नसल्यामुळे पुन्हा सुनावणी घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यासह ६ जिल्ह्यांत "शेतकरी भवन" बांधण्याची मान्यता रद्द केल्याबाबत**

**(१५) * ७१५१ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यासह गडचिरोली, जालना, कोल्हापूर, नांदेड व अमरावती या सहा जिल्ह्यांत प्रत्येकी १.५२ कोटी रुपये खर्चाची "शेतकरी भवन" बांधण्याची प्रशासकीय मान्यता सहकार व पणन विभागाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये रद्द केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे उक्त ६ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना नियोजित निवास व इतर सुविधा (२० बेड, हॉल, दुकाने) मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच संबंधित बाजार समित्यांनी त्यांच्या हिश्श्याच्या ३०-५०% निधीची केलेली तरतूद व्यर्थ जावून शेतकऱ्यांची गैरसोय होवून बाजार समित्यांच्या कामात अडथळा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ६ जिल्हयांतील शेतकऱ्यांसाठी पर्यायी भोजन व निवासाची पर्यायी सोय करण्यासह सदर निर्णयाच्या फेरविचाराबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

संबंधित ६ बाजार समित्यांच्या नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सोयाबीनच्या खरेदीत व्यवस्थापक व संचालक यांनी केलेला अपहार व गैरव्यवहार**

**(१६) * १००१८ श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयाबीनच्या खरेदीत अपहार व विविध गैरव्यवहार केल्याबाबत राज्यातील वीस खरेदी केंद्रांना काळया यादीत टाकण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहारास कारणीभूत असणाऱ्या व्यवस्थापक, संचालक व इतर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गैरव्यवहारांना जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करुन मदत केल्यामुळे त्यांचीही चौकशी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय

(२) नाही

(३) व (४)

संबंधित राज्यस्तरीय नोडल संस्थांच्या सब एजन्ट संस्थांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्याचे कळविण्यात आले असून संबंधितांकडून या प्रकरणी खुलासा मागविण्यात आला आहे.

तसेच व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांनी जिल्हा पणन अधिकारी बीड, अकोला, बुलढाणा व चंद्रपूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्ह्यांतील शासकीय व जिल्हा परिषद शाळांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१७) * ७५०१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संदिप क्षीरसागर (बीड), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव**

**मध्य), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: सिंधुदुर्ग, बीड, हिंगोली, अलिबाग (जि.रायगड), नागपूर, नाशिक, अमरावती, परभणी व अनेक जिल्ह्यांतील शासकीय व जिल्हा परिषद शाळांपैकी अनेक शाळा मोडकळीस आल्याचे, वर्गखोल्या पडण्याचे, छताला गळती लागण्याच्या व संरक्षक भिंती जमीनदोस्त झाल्याची घटना माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही उक्त जिल्ह्यांमध्ये निधी उपलब्ध न झाल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाळांच्या अत्यंत जीर्ण अवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात असल्याचे विविध जिल्ह्यांतील पाहणीत व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) शासकीय/ जिल्हा परिषदेच्या शाळांच्या व वर्गखोल्यांच्या मोठया व किरकोळ दुरूस्तीबाबत प्रस्ताव प्राप्त आहेत.
(२), (३), (४) व (५) या कामांना जिल्हा वार्षिक योजना, समग्र शिक्षा अभियान व अन्य योजनांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

-----------------

**भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जकातदार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवल्याबाबत**

**(१८) * ९५८५ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जकातदार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावी विज्ञान शाखेला प्रवेशित ३६ विद्यार्थ्यांना वर्षाच्या अंतिम परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील विद्यार्थ्यांनी शाळा शुल्क न भरल्याच्या कारणावरून त्यांना विज्ञान शाखेच्या मराठी विषयाच्या पहिल्या पेपरला बसू न देता परत पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील ३६ विद्यार्थ्यांमध्ये मुलींची संख्या अधिक असून देखील एकीकडे मुलींना मोफत शिक्षण देण्यात येत असतानाही शुल्क बाकी असल्याकारणाने विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवणाऱ्या मुख्याध्यापक यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे,

सदर विद्यालयातील इयत्ता ११वी ची विज्ञान शाखेची तुकडी स्वंय अर्थ सहाय्यीत असून सदर तुकडी मध्ये ६३ विद्यार्थी शिकत आहेत. त्यापैकी ३६ विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क न भरल्यामुळे त्यांची मराठी विषयाची

दि. ८ एप्रिल,२०२५ रोजी परीक्षा घेण्यात आली नाही. तथापि सदर विद्यार्थ्यांची परीक्षा दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी घेण्यात आली आहे.

(३) सदर ३६ विद्यार्थ्यांमध्ये २१ मुले व १५ मुलींचा समावेश आहे. सदर प्रकरणी शाळेच्या मुख्यध्यापकांना सक्त ताकीत देण्यात आली आहे. शासन निर्णय दि. १२/०८/२०२१ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचा सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे गुलटेकडी येथील मार्केट यार्ड मधील इमारतीच्या कामास होत असलेल्या विलंबाबाबत

**(१९)** * **७९७९ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे गुलटेकडी मार्केट यार्डमध्ये सन २०१६ मध्ये रुपये ११६ कोटी खर्च करून सुरु केलेले फुल बाजारामधील अद्यावत अकरा मजली इमारतीचे काम अद्यापही अपूर्ण असल्याचे माहे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या उभारणीसाठी रुपये ५४ कोटी इतका खर्च अपेक्षित असताना केवळ बांधकामाला विलंब झाल्याने सदर इमारतीच्या कामाची किंमत रुपये ११६ कोटींवर गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पणन मंत्री यांनी सदर कामाची पाहणी करून ते शंभर दिवसांत पूर्ण करण्याच्या सूचना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मध्ये देऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पुणे कृषि उत्पन्न बाजार समिती येथील मुळ प्रकल्पात व्यापा-यांच्या मागणी वरून बदल होऊन अतिरिक्त २ मजले व पार्किंगकरीता १ अतिरीक्त तळमजला बांधण्याबाबत प्रकल्पात बदल झाल्यामुळे बांधकाम आजपावेतो सुरू आहे.

त्यानुसार इमारतीच्या गाळयांची उंची वाढवणे व गाळयांची संख्या २५२ वरून ४३७ करण्यात आली, लिफ्टच्या संख्येत वाढ, मध्यवर्ती वातानूकुलित यंत्रणेची योजना इ. या खर्चात वाढ ५४ कोटी वरून ११६ कोटी झालेला आहे.सदर खर्चात वाढ बांधकाम खर्च वाढीमुळे झालेला असून विलंब झाल्यामुळे नाही.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे,

मंत्री (पणन) यांनी बाजार समितीस दि.१०.०१.२०२५ रोजी भेट दिली असता त्यावेळी पाहणी अंती प्रकल्पाचे काम जलदरित्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत. या प्रकरणी बांधकाम सुरु असल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भारतातून अमेरिकेमध्ये निर्यात केलेला आंबा कागदपत्रांच्या त्रुटीमुळे परत पाठविल्याबाबत

**(२०) * ७७०७ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतातून अमेरिकेला निर्यात केलेला रुपयां ४ कोटी २८ लाख इतक्या रकमेचा आंबा कागदपत्रांतील त्रुटीमुळे स्वीकारण्यास तेथील यंत्रणेने नकार दिल्याने आंबा तेथेच नष्ट करावा लागला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईमध्ये विकिरण केंद्र सुरु असून सदर केंद्रावर अमेरिकन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये आंब्यांवर विकिरण प्रक्रिया केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकिरण प्रक्रिया केल्यानंतर आवश्यक पीपीक्यु २०३ अर्जावर सहया केल्या जातात परंतु सदर कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यामुळे सदर आंबा स्वीकारण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात यामधील त्रुटी दूर करुन आंबा निर्यातदारांचे सुमारे ४ कोटी २८ लाख रुपयांचे झालेले नुकसान भरुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) नुकसानीची चौकशी करुन रकमेबाबतची खातरजमा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२१) * ७७५९ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील छत्रपती संभाजी महाराज नगर, नांदेड, जालना व लातूर जिल्हयातील सिंचन प्रकल्पामध्ये माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केवळ ३६ टक्के पाण्याचा साठा होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने उक्त जिल्हयातील १६६ गावांना टँकरने आणि २६७ विहिरी अधिग्रहित करून पाणी पुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडयातील भीषण पाणी टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय हे खरे आहे.

या महामंडळांतर्गत छत्रपती संभाजी नगर, जालना या जिल्ह्यात मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पात दि. २५ एप्रिल, २०२५ खालीलप्रमाणे पाणी साठा उपलब्ध होता.

| अ.क्र. | जिल्हा | प्रकल्प | % |
|---|---|---|---|
| १ | छ. संभाजी नगर | मोठे | ४३% |
| | | मध्यम | २८% |
| | | लघु | १८% |
| २ | जालना | मोठे | -- |
| | | मध्यम | २१% |
| | | लघु | १८% |
| ३ | लातूर | मोठे | -- |
| | | मध्यम | २३% |
| | | लघु | २७% |
| ४ | नांदेड | मोठे | ३९% |
| | | मध्यम | ३०% |
| | | लघु | २०% |

(२) अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल २०२५ अखेर उक्त जिल्ह्यामध्ये टंचाई अंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

| जिल्हा | गाव | वाड्या | टॅंकर | अधिग्रहीत विहीरीं |
|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | १५४ | १८ | २३० | १२९ |
| जालना | ५८ | १५ | ९८ | १२७ |
| नांदेड | ०४ | १५ | १४ | ११४ |
| लातुर | ७८ | ०० | ०३ | ९० |
| एकुण | २९४ | ४८ | ३४५ | ४६० |

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यामध्ये जल जीवन मिशन कार्यकमाची अंमलबजावणी करण्यात येत असून या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लिटर प्रती दिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे उदिष्ट आहे.

मराठवाडा विभागातील पाणी टंचाई दुर करण्यासाठी जल जीवन मिशनतंर्गत जिल्हा निहाय मंजुर योजना/ सध्यस्थिती याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| जिल्हा | मंजुर योजना | पुर्ण योजना | प्रगती पथावरील योजना |
|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ११८५ | ६९० | ४९५ |
| जालना | ७५२ | २५९ | ४९३ |
| बीड | १२९९ | ३७७ | ९२२ |
| परभणी | ७४० | ३६१ | ३७९ |
| हिंगोली | ६९५ | २३६ | ४५९ |
| नांदेड | २१७८ | ११२४ | १०५४ |
| धाराशिव | ६७२ | ३६७ | ३०५ |
| लातुर | ९५६ | ५०७ | ४४९ |
| एकुण | ८४७७ | ३९२१ | ४५५६ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील शिक्षण अधिकाऱ्यांविरोधातील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत**

**(२२) * ९१४३ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याविरुद्ध शिक्षक भरती व फरक देयक प्रकरणी रू.४०० ते ५०० कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी समितीची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांची अन्यत्र बदली न करण्याबाबत शासनाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये आदेशित केले आहे, हे हीखरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशीअंती संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणामध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाकडून दि.०९.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठित करण्यात आलेली असून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) चौकशी समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील दिंडोरा धरणग्रस्तांना मोबदला देण्याबाबत

**(२३)** * **७२७० डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील दिंडोरा गावाजवळील वर्धा नदीवर बॅरेज प्रकल्प तयार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बॅरेजसाठी शासनाने सन १९९३ ते १९९९ मध्ये शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी अल्प मोबदला देऊन संपादीत केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणाचे काम १९९७ पासून सुरु झाले, त्यामुळे धरणग्रस्तांची सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार मोबदल्याची मागणी असून त्यासाठी ते सातत्याने आंदोलन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून शासनाने धरणग्रस्तांना सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिंडोरा बॅरेजच्या बुडीत क्षेत्राकरीता भुसंपादन अधिनियम १८९४ अन्वये १०९९.११ हे. खाजगी जमीन संपादीत करण्यात आलेली असून सदर जमिनीच्या भुसंपादनाकरीता भुसंपादन कायदा-१८९४ नुसार रु. १२.१६ कोटी मोबदला सन १९९५ ते २००० मध्ये महसूल विभागामार्फत अदा करण्यात आलेला आहे.

परंतु, यानंतर न्यायालयात गेलेल्या भुधारकांना वाढीव मोबदला पोटी कलम १८ व २८ अंतर्गत रु. १२.७० कोटी इतका मोबदला सन २००५ ते २०१५ मध्ये अदा करण्यात आलेला आहे.

त्यानंतरही वाढीव मोबदला मिळणेकरिता भुधारकांनी मागणी केल्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार रु.३४.०० कोटीचा सानुग्रह अनुदान मंजुर करण्यात आले. त्यापैकी रु.२९.७३ कोटी सन २०१८-१९ मध्ये महसूल विभागामार्फत वाटप केले आहेत.

भुधारकांच्या मागणीनुसार सानुग्रह अनुदान दिल्यामुळे सद्यस्थितीत प्रकल्पग्रस्त भुधारकांना आर्थिक मोबदला देय होत नाही.

(३) हे खरे आहे.

दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्त नवीन भुसंपादन कायद्यानुसार मोबदला मिळण्यास्तव वारंवार प्रकल्पस्थळी आंदोलन करीत आहेत.

(४) धरणग्रस्तांच्या मागण्या धोरणात्मक बाबी असल्यामुळे, मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याबाबत विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास सुचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांकडून कॅपिटेशन डोनेशन व अनामत रक्कम पालकांना परत करणेबाबत

**(२४) * ११५७७ श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांना प्रवेश देताना बेकायदेशीररीत्या 'कॅपिटेशन डोनेशन' व अनामत रक्कम घेतली जात असून सदर, अनामत रक्कम परत करण्याचे लेखी आश्वासन असूनही ती रक्कम परत केली जात नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारांमुळे कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनामत रक्कम ही विद्यार्थ्यांना शाळा सोडताना परत देणे बंधनकारक असूनही अनेक वेळा पालकांनी आठवण करून दिल्यानंतरही संस्थाचालक टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कॅपिटेशन डोनेशन व अनामत रक्कम पालकांना परत करणेबाबत तसेच दोषी संस्थाचालकांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अशा आशयाची एक तक्रार विभागास प्राप्त झाली आहे.
(२) व (३) या प्रकरणी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ मधील तरतूदींनुसार सखोल चौकशी करण्यात येत आहे.
(४) व (५) चौकीशी अंती दोषी आढल्यास संबधिता विरुध्द कारवाई करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील शाळा व अंगणवाड्यांचे जिओ टॅगिंग करणेबाबत

**(२५) * ८८१७ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शिक्षणाची संस्कार केंद्रे असणाऱ्या सर्व शाळा व अंगणवाड्यांचे छायाचित्रांसह जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ॲपअंतर्गत राज्यातील विविध विभागांमार्फत कार्यरत असणा-या सर्व शाळा आणि

अंगणवाड्यांसाठी विशेष डॅशबोर्ड तयार केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एकूण १,०८,३०१ शाळांपैकी केवळ ७७,२९० शाळांचेच आतापर्यंत जिओ टॅगिंग पूर्ण झाले असून उर्वरित ३१,०११ शाळांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उर्वरित शाळांमधील पिण्याचे पाणी, शौचालय आदींसह उपलब्ध भौतिक सुविधांसह जिओ टॅगिंग करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही
(३) हे खरे नाही.
(४) राज्यातील एकूण १,०८,१६५ शाळांपैकी १,०१,३१९ (९३.६७%) शाळांचे मॅपिंग पूर्ण झालेले आहे. उर्वरित शाळांचे मॅपिंग करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मनी ट्रान्सफर प्रणाली मधील तांत्रिक समस्येमुळे शेतकऱ्यांना तूर खरेदीची रक्कम मिळण्यास विलंब होत असल्याबाबत

**(२६) * ७८६७ श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पणन विभागाच्या मनी ट्रान्सफर सिस्टीम मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने लातूर जिल्ह्यातील अनेक तूर उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळण्यास विलंब होत असल्याने तूर उत्पादक शेतकरी आर्थिक समस्येत आले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने तूर खरेदी किंमत रुपये ७५५० प्रति क्विंटल निश्चित केल्याने ती प्रचलित बाजारभावापेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यांनी तूर उत्पादन केंद्रावर मोठ्या प्रमाणात नोंदणी करूनही त्यांना तूर विक्रीचे पैसे मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लातूर विभागात नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांची तूर खरेदी करून त्यांच्या खात्यावर तुरीची रक्कम तात्काळ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. जयकुमार रावल :** (१), (२) व (३) नाही

हंगाम २०२४-२५ मध्ये लातूर जिल्हात २,५९२ शेतकऱ्यांकडून २५,७०२.३ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. २५९२ पैकी २४७४ शेतकऱ्यांना रु.१८.६ कोटी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना रक्कम अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नॅक ॲक्रिडीटेशनची प्रक्रिया आणि महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना करण्याबाबत

**(२७) * १०१६६ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅक (NAAC) अक्रिडीटेशनची प्रक्रिया व महाविद्यालय विकास समिती सीडीसी ची स्थापना न केल्यामुळे मुंबई विद्यापीठाने २२९ महाविद्यालयांची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून थांबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅक ॲक्रिडीटेशनची प्रक्रिया आणि महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना न केल्याने विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांना रु.१०,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन प्रवेश प्रक्रिया सुरुळीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाने माहे एप्रिल- मे, २०२५ च्या सूचना पत्रांद्वारे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित २२९ महाविद्यालयांना नॅक/ एनवीए अधिस्वीकृती आणि पुर्नअधिस्वीकृती तसेच महाविद्यालय विकास समितीची (सीडीसी) स्थापना न केल्यामुळे त्यांची प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून स्थगित केल्याचे तसेच सदर महाविद्यालयांना रू.१०,०००/- (रूपये दहा हजार मात्र) दंड आकारण्यात आल्याचे सूचित केले होते.

(३) नॅक, बंगलोर संस्थेकडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगीन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु असल्याने महाविद्यालयांना नॅक अधिस्विकृती व पुर्नअधिस्वीकृती नोंदणी करता येणे शक्य होत नसल्याची बाब विचारात घेऊन व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संबंधित महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करणेकरीता ६ महिन्यांची मुदत प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २२ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली आहे. त्यानुसार, मुंबई विद्यापीठाने दिनांक २३ मे, २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सदर महाविद्यालयांना त्रुटी पूर्ततेकरीता सहा महिन्यांची मुदतवाढ देऊन स्थगित केलेले प्रवेश पूर्ववत सुरू केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुडूस (ता. वाडा, जि.पालघर) येथील हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेज लि. कंपनीसाठी अतिरिक्त पाणी उपसा केला जात असल्याबाबत

**(२८) * ९१२३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वैतरणा नदीवरील ग्रांध्रे येथे बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यातून कुडूस (ता. वाडा) येथील कोकाकोला बेव्हरेज लि. कंपनीसाठी अवैधरित्या जास्त पाणी उपसा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैतरणा नदी पात्रालगत असलेल्या आबिटघरसह १७ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने सदर कंपनीचा पाणीपुरवठा तात्काळ बंद करण्याबाबत ग्रांध्रे बांधाऱ्यावर श्रमजीवी संघटना (जि. पालघर) यांनी दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास ठिय्या आंदोलन सुरु केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीला शासन निर्णयानुसार ०.६१ दलघमी इतके पाणी उपसा परवानगी असतानाही कंपनी त्यापेक्षा अधिक पाणी उपसा करत असल्यामुळे स्थानिकांनी आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय हे खरे नाही.
मे. हिंदुस्थान कोका कोला कंपनीस शासनाने ०.६१ द.ल.घ.मी शाश्वत पाणी कोटयास १९९९ मध्ये मान्यता दिली असून शासनाचे पत्र बिंसिंआ-कोकाकोला २२/२०२४/सिंव्य (धोरण) दि.२५/०४/२०२४ अन्वये पुढील २५ वर्षाकरीता पाणीकोटयाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागामार्फत आबिटघर व १७ गावे या प्रादेशिक ग्रामिण पाणी पुरवठा योजनेसाठी वाडा को. प. बंधाऱ्यातून ०.३० द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षीत करण्यात आला आहे.

हिंदुस्थान कोकाकोला बेव्हेरजेस कंपनीने त्यांचे मुख्य पाईपलाईनवर (वाडा को.प.बंधारा ते कुडूस प्लांट) काही अनधिकृत नळजोडणी असल्याने मोठया प्रमाणात पाणीनाश होत आहे. त्यामुळे मंजूर ०.६१ पाणीकोटा सोबत अतिरीक्त आरक्षण ०.२१ द.ल.घ.मी ची मागणी केली होती.

तथापी वाडा को. प. बंधाऱ्याचे जललेखा अहवालानुसार कंपनीचे मागणीप्रमाणे वाडा बंधाऱ्यामध्ये अतिरीक्त ०.२१ द.ल.घ.मी. पाणी उपलब्ध नसल्यामुळे सदर अतिरिक्त आरक्षण मंजूर करण्यात आले नाही.

सदर कंपनीमार्फत वाडा को.प. बंधाऱ्यातून पाणी वापर करण्यात येत असून कंपनीकडून जास्तीचा पाणी वापर केल्यास अतिरिक्त पाणी वापरावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधीकरणाच्या ठोक जलप्रशुल्काच्या आदेशानुसार दंडनीय आकारणी करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्रमजीवी संघटना महाराष्ट्र मु.उसगाव डोंगरी, पो.भताने, (ता.वसई जि.पालघर) यांचेकडून दि.१५/०४/२०२५ रोजी कोकाकोला कंपनी, कुडूस (ता.वाडा जि.पालघर) येथे आंदोलन करण्यात आले होते.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागामार्फत आबिटघर व १७ गावे या प्रादेशिक ग्रामिण पाणी पुरवठा योजनेसाठी वाडा को. प. बंधाऱ्यातून ०.३० द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षीत करण्यात आला आहे. तथापी वितरण प्रणालीचे काम पुर्ण नसल्याने अद्यापपर्यंत त्यांचेकडून पाण्याची उचल सुरु झालेली नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हिंदुस्थान कोकाकोला बेव्हेरजेस कंपनीने मंजूर ०.६१ द.ल.घ.मी आरक्षणापेक्षा केलेल्या जास्तीचे पाणी वापरावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधीकरणाच्या ठोक जलप्रशुल्काच्या आदेशानुसार दंडनीय आकारणी करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याबाबत**

**(२९) * ७२५१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.संजय देरकर (वणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.बाबुराव कदम-कोहळीकर (हदगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळेतील मुलांच्या लैंगिक शोषणाचे प्रकार रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधी सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याचे निदेश मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील १ लाख, ५ हजार, ५२ शाळांपैकी केवळ ५० हजार शाळांमध्येच सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच यवतमाळ जिल्हापरिषदेत जिल्हा नियोजन समितीमार्फत जिल्हा परिषदेच्या ३९५ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरिता रु. ९ कोटी इतकी तरतूद करण्यात येवूनही शाळांमध्ये कॅमेरे बसविण्याचे काम अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) अशी कोणतीही मुदत दिल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) अंशतः खरे आहे
(४) अ - यवतमाळ जिल्हा परिषदेस जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ अंतर्गत जिल्हा परिषद १७ आदर्श शाळांमध्ये सी सी टी व्ही कॅमेरे लावण्याबाबत ५९,७५,०००/-निधी प्राप्त झाला.

ब - सन २०२४-२५ अंतर्गत यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयाकडून दिनांक ०९/१२/२०२४ नुसार जिल्हा परिषदेच्या जास्त पटसंख्या असलेल्या एकूण ३९५ शाळांमध्ये सी सी टी व्ही लावण्याकरिता रू.९,८५,५०,०००/- निधीची मागणी करण्यात आली आहे. निधी अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.

क - १५ वा केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ व २०२१-२२ च्या बंधित अबंधित ग्रॅन्टच्या (टाईट / अनटाईट) मधील (अखर्चित / व्याज / बचत रक्कम) निधी रू. १,९८,००७,१९/- प्राप्त असून यवतमाळ जिल्हा परिषद कार्यालयाचे पुरवठा आदेश दि. २६/०६/२०२५ नुसार ८० जिल्हा परिषद शाळांमध्ये सी सी टी व्ही लावण्याबाबत पुरवठा आदेश देण्यात आले आहे.

(५) राज्यातील सर्व शाळांमध्ये सी.सी.टी व्ही कॅमेरे बसविण्याबाबतची कार्यवाही करणेबाबत शासन निर्णय दिनांक १३ मे, २०२५ अन्वये शासनाने दिलेल्या सूचना प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिनांक २१/०५/२०२५ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविलेल्या आहेत.

(६) निरंक

-----------------

**राज्यातील गावांमध्ये शाळा सुरु करण्यासह मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) * ७११९ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरविण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या संयुक्त बैठकीत युडायस च्या आकडेवारीनुसार राज्यातील ८२१३ गावांमध्ये अद्याप शाळेची सुविधा नसल्याचे नमूद करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांपैकी १६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा तर ६५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पाच हजार ३७३ शाळांमध्ये वीज, ५३० शाळांमध्ये पिण्याचे पाणी, ३,३३५ शाळांमध्ये मुलींसाठी तर ५,१२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या १२ लाख ३२ हजार ९३८ एवढी घटली असून २५ हजार ४६६ शाळांमध्ये प्रत्येकी ३० पेक्षा कमी विद्यार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार गावांमध्ये शाळा सुरु करण्यासह मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

तथापि, शिक्षण हक्क कायदा, २००९ मधील भाग ३ कलम ६ (३) (१) नुसार नजीकच्या शाळेच्या क्षेत्रामध्ये

किंवा हद्दीच्या आत शाळा प्राथमिकस्तर १ कि.मी., उच्च प्राथमिक ३ कि.मी. व माध्यमिक ५ कि.मी. उपलबध नाही, अश्या वस्त्यांमधील मुलांना नजिकच्या शाळेत जाण्यासाठी वाहतूक सुविधेचा लाभ समग्र शिक्षा अंतर्गत देण्यात येतो.

वाहतुक सुविधेसाठी प्रती विद्यार्थी ६०० प्रमाणे एकूण रू.६०००/- दहा महिन्याकरीता तरतुद मंजुर केली जाते.

(३) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय २९.०६.२००० नुसार कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्यास तात्पुरत्या स्वरूपात पिण्याच्या पाण्याची साठवणूक करण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन निर्णय दि. १६.०४.२०२५ नुसार जलजिवन मिशन गौण खजिन योजनेमधून नळ जोडणीव्दारे शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. समग्र शिक्षा अंतर्गत या वर्षी मुलांकरिता १६६८ व मुलीकरिता १०८७ स्वतंत्र स्वच्छतागृह बांधकाम करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शासन व जिल्हा परिषदांकडून सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, समग्र शिक्षा अभियान व राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान, शाळा दत्तक योजना या माध्यमांतून इमारतींचे बांधकाम, पायाभुत सुविधा व देखभाल दूरूस्ती केली जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत आयोजित करण्यात आलेल्या परिक्षेतील गैरप्रकाराची चौकशी करणेबाबत**

**(३१) * ७७७९ श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत २८,८३७ विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या एमएचटी-CET परिक्षेमध्ये, दिनांक ४ मे, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेमधील तब्बल २१ प्रश्न चुकीचे असल्यामुळे परिक्षा पुन्हा घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील एका परिक्षा केंद्रावर ५० गुणांच्या गणिताच्या प्रश्नपत्रिकेतील सुमारे २० ते २५ प्रश्नांमध्ये चारही पर्याय चुकीचे असल्याने विद्यार्थ्यांनी चुकीचे पर्याय निवडले व याबाबत त्यांनी परिक्षा केंद्राकडे तक्रार केली असता कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी चौकशी करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१), (२) व (३) खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात आलेली एमएचटी-सीईटी २०२५ ही सामाईक प्रवेश परीक्षा PCB आणि PCM ग्रुपकरीता दि.०९ एप्रिल, २०२५ ते दि.२७ एप्रिल, २०२५ या कालावधीत एकूण २८ सत्रात पार पडली आहे.

सदरील २८ सत्रांपैकी २७ सत्रांमध्ये ६,७७,५६० उमेदवारांची परीक्षा सुरळीतपणे पार पडली असून, दि.२७ एप्रिल, २०२५ रोजीच्या सकाळच्या सत्रात तीन भाषांमध्ये (इंग्रजी, मराठी आणि उर्दू) घेण्यात आलेल्या PCM ग्रुपच्या परीक्षेदरम्यान २७,८३७ उमेदवार उपस्थित होते. सदरील उमेदवारांना गणित विषयाशी संबंधित इंग्रजी भाषांतरामधील २१ प्रश्नांमध्ये चूका असल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. मराठी आणि उर्दू प्रश्नांमध्ये कोणतीही त्रुटी अथवा चूक नव्हती. इंग्रजी भाषांतरामध्ये त्रुटी / चुका आढळल्याने ज्या उमेदवारांनी दि.२७ एप्रिल, २०२५ रोजी सकाळच्या सत्रात परीक्षा दिलेली होती, अशा उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी दि.०५ मे, २०२५ रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली. सदर फेरपरीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे.

(४) सदरील प्रकरणी संबंधित विषय तज्ञांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्यानुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चर्चगेट, मादाम कामा मुंबई विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहात दुरुस्ती करणेसह विद्यार्थिनींना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) * ७२५४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.महेश सावंत (माहिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्चगेट, येथील मादाम कामा मुंबई विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहात विद्यार्थिनींना मोठया गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद असलेले कॅन्टीन, पिण्याच्या पाण्याची गैरसोय, तुटलेले सिलिंग, जागोजागी पडलेले भंगार साहित्य, अपुरा विद्युत पुरवठा, सात मजली इमारतीसाठी केवळ एक कुलर व दोनच गिझर तेही बंद असल्याने तेथील १२६ विद्यार्थीनींची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतिगृहाच्या व्यवस्थापनासाठी असलेले वॉर्डन दिवसभरात फक्त दोन तास उपस्थित राहून रात्री

सुरक्षारक्षका शिवाय इतर कोणीही उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी अधिसभा सदस्यांनी वसतिगृहास भेट देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर वसतिगृहाची तातडीने दुरुस्ती करुन विद्यार्थिनींना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
सदर वसतिगृहामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दिवसाला अंदाजे २५,००० लिटर पुरेशा पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. वसतिगृहात पाण्याचे ४ कुलर्स व ३२ गिझर्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. याबाबत वसतिगृहातील विद्यार्थीनींची कोणतीही तक्रार नाही. मादाम कामा वसतिगृहातील मेस काही अपरिहार्य कारणामुळे १० दिवस बंद होती, जेव्हा मेस बंद असते तेव्हा विद्यार्थीनींना याची पूर्वसूचना दिली जाते. आता, मेस नियमित सुरु आहे. वसतिगृहातील सर्व लाईट्स चालू स्थितीत आहेत.
वसतिगृहाच्या दुसऱ्या मजल्यावरच्या बाथरूम मधील लिकेजमुळे पहिल्या मजल्यावरील फॉल सीलिंगचा काही भाग खराब झाला होता, त्यामुळे सदरच्या फॉल सीलिंगचा काही भाग खबरदारी म्हणून अभियांत्रिकी विभागामार्फत काढण्यात आला होता. सदर वसतिगृहामध्ये छताचा कोणताही भाग कोसळलेला नव्हता, सदरच्या ठिकाणी डागडुजी करण्यात आलेली असून फॉल सीलिंग बसवण्यात आलेले आहे. वसतिगृहामध्ये स्थापत्य विषयक कामे चालू असून भंगारचे साहित्य जागोजागी पडलेले नसून एका रूममध्ये ठेवण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
वसतिगृहात पूर्ण वेळ वसतिगृह अधीक्षिका, सुरक्षारक्षक व कर्मचारी विद्यार्थीनींच्या सेवेशी तत्पर असतात.
(४) हे खरे नाही.
(५) सदर वसतिगृह हे नियमानुसार सुरू असून सर्व विद्यार्थीनींसाठी चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.